# अदानी ट्रान्समिशन, इलेक्ट्रिसिटीला पुरस्कार

**मुंबई :** नुकत्याच झालेल्या 'दि असेट कंट्री अवॉर्डस् २०२०' सोहळ्यात अदानी ट्रान्समिशन आणि अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीला पुरस्कार प्राप्त झाले. यावर्षी अदानी ट्रान्समिशनने 'बेस्ट कॉर्पोरेट बॉण्ड' पुरस्कार पटकावला. तर अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने 'बेस्ट न्यू बॉण्ड' पुरस्कार प्राप्त केला. 'दि असेट' गेल्या २० वर्षांपासून या पुरस्कारांचे आयोजन करते.

अदानी समूहातील कंपन्यांना व्यवसायासाठी मिळणाऱ्या पुरस्कारांसोबतच त्यांच्या भांडवली व्यवस्थापन कार्यक्रमांसाठीही पुरस्कार प्राप्त होत आहे ही अभिमानास्पद बाब आहे, असे अदानी ट्रान्समिशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी सांगितले.